महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची रावळगाव मळयातील मौजे रावळगाव, ता. मालेगाव, जि. नाशिक येथील गट क्र. ३१९ मधील डंकीण विहीर व त्यासभोतालचे फक्त ४५ आर क्षेत्र मौजे रावळगाव या गावच्या पाणीपुरवठा योजना विकसीत करण्यासाठी सदर ग्रामपंचायतीस कब्जेहक्काने हस्तांतरीत करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक : व्हिआयपी-२०१७/प्र.क्र.०७/ल-७
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २५ जून, २०१९

वाचा:- व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्या. पुणे यांचे पत्र क्र. जमिन/१२१४/ रावळगांव/५५४/डंकीण/ज-३४० दि.२८.०५.२०१९ चे पत्र.

प्रस्तावना :-

मौजे रावळगाव, ता. मालेगाव, जि. नाशिक या ग्रामपंचायतीचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या रावळगाव मळयातील मौजे रावळगाव, ता. मालेगाव, जि. नाशिक येथील गट क्र. ३१९ मधील महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या मालकीची डंकीण विहीर यासभोवतालचे फक्त ४५ आर क्षेत्र मौजे रावळगाव ग्रामपंचायतीस कब्जेहक्काने हस्तांतरीत करण्याबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ (मर्या.), पुणे यांनी शासनाकडे सादर केलेला आहे. त्यानुषंगाने शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र शेतजमीन (ज.धा.क.म.) अधिनियम, १९६१ मधील कलम २८-१अअ मधील पोटकलम (३-अ) मधील तरतूदीनुसार महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाकडील जमीन राज्य शासनास सार्वजनिक कारणासाठी बाजारभावाने होणारी जमीनीची किंमत घेवून संस्थाना हस्तांतरीत करण्याची तरतूद आहे. सदर तरतूदीनुसार महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची रावळगाव मळयातील मौजे रावळगाव, ता. मालेगाव, जि. नाशिक येथील गट क्र. ३१९ मधील डंकीण विहीर व त्यासभोवतालचे फक्त ४५ आर क्षेत्र मौजे रावळगाव या गावची पाणीपुरवठा योजना विकसीत करण्यासाठी सह जिल्हा निबंधक वर्ग-१, नाशिक यांनी मुल्यांकित केलेली रू. ६,१२,४००/- (रुपये सहा लक्ष बारा हजार चारशे फक्त)इतकी रक्कम मौजे रावळगाव ग्रामपंचायतीने महाराष्ट्र राज्य शेती महामंडळास देण्याच्या अटीवर कब्जेहक्काने हस्तांतरीत करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर जमीन हस्तांतरणाबाबतच्या अटी व शर्ती पुढीलप्रमाणे राहतील :-

(१) प्रस्तुतची जमीन मौजे रावळगाव ग्रामपंचायत, ता. मालेगाव, जि. नाशिक हे भोगवटादार वर्ग - २ म्हणून धारण करील.

(२) सदर जमिनीचा वापर मौजे रावळगाव गावच्या पाणीपुरवठा योजना विकसित करण्यासाठी व त्या प्रयोजनासाठीच करणे सदर ग्रामंचायतीस बंधनकारक राहील.

(३) मौजे रावळगाव ग्रामपंचायतीने पाणीपूरवठा योजना विकसीत केल्यानंतर त्याबाबतची माहिती सर्व कागदपत्रासह जिल्हाधिकारी, नाशिक यांच्यामार्फत शासनास सादर करणे सदर ग्रामपंचायतीस बंधनकारक राहील.

(४) वरील अटी व शर्तीचा भंग झाल्यास देण्यात आलेली मान्यता रद्द करण्यात येईल.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०६२६१६५६०७६७१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

SHIVAJI S
CHOURE

Digitally signed by SHIVAJI S CHOURE
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=fa37c7e079f23b78a27c84b9d6e46f94d549fc79ba170d5815f3619617b13313, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=03fe2b2d715bed4b0d90a99525ae06946672e68ea905c97da50b34fd21223011, ou=REVENUE, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA,
cn=SHIVAJI S CHOURE
Date: 2019.06.26 17:00:14 +05'30'

(शिवाजी चौरे)
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रत :-

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
२) मा. मंत्री, (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा. राज्यमंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) अपर मुख्य सचिव, महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई
६) प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
७) विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक
८) जिल्हाधिकारी, नाशिक
९) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, अहमदनगर
१०) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ(मर्या.), पुणे
११) निवडनस्ती.